# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## वित्त व लेखा विभाग
## आय.एस.ओ. ९००१:२००८ युनिट

## परिपत्रक

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शैक्षणिक विभागांमध्ये एम.फिल,पी.एच.डी. करणा-या विद्यार्थ्यांना विविध अनुदान संस्थेकडून अधिछात्रवृत्ती,घरभाडेभत्ता मिळत असतो. विद्यार्थी वसतीगृहामध्ये राहत असल्यास त्यांना घरभाडे भत्ता दिला जात नाही, परंतू असे निदर्शनास आले आहे की, काही विद्यार्थी वसतीगृहामध्ये राहून देखील घरभाडे भत्ता मिळविण्यासाठी अर्ज करीत आहेत.

यासंदर्भात सुसूत्रता आणण्यासाठी अधिछात्रवृत्ती व घरभाडेभत्ता यासाठी विकेंद्रित वित्त व लेखा विभागामध्ये अर्ज सादर करताना अधिछात्रांनी खालील बाबींची पूर्तता करावी.

१. प्रत्येक महिन्याच्या अधिछात्रवृत्ती, घरभाडेभत्ता यासाठी त्या महिन्यामध्येच अर्ज सादर करावा.
२. अधिछात्र वसतीगृहामध्ये राहत नसेल तर वसतीगृह प्रमुख यांचे Not residing in Hostel/Not a Hosteler असा शिक्का व सही अर्जावर घ्यावी अन्यथा अर्ज स्विकारला जाणार नाही.
३. मार्गदर्शक आणि विभागप्रमुख यांचे प्रमाणीकरण झाल्यानंतरच विकेंद्रित वित्त व लेखा विभागामध्ये अर्ज सादर करावा.
४. उपरोक्त बाबी पूर्ण करुन सदरील अर्ज प्रत्येक महिन्याच्या २५ ते ३० या तारखांमध्येच विकेंद्रित वित्त व लेखा विभागाकडे सादर करण्यात यावेत.

गणेशखिंड,पुणे -४११ ००७.
जावक क्र. वित्त/अनुदान/२०१५-१६/९७०
दि. ११/०८/२०१५

**वित्त व लेखा अधिकारी**

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक पदव्युत्तर विभाग प्रमुख.
२. प्रमुख,विकेंद्रित वित्त शाखा.